माहितीचा अधिकार

महाराष्ट्र शासन

# माहितीचा अधिकार अधिनियम, 2005

# सुस्वागतम्

## श्री.संदीप सावंत

माहिती अधिकार प्रशिक्षणक

यशदा, पुणे

# उद्देश.......

- प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाअधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टिने,
- सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळवता यावी म्हणून,
- नागरिकांच्या माहिती मिळण्याच्या अधिकाराची व्यवहार्य शासन पध्दत आखून देण्याकरिता,
- केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग घटित करण्याकरिता
- आणि ज्याअर्थी, लोकशाहीमध्ये माहितीगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता यावी म्हणून,
- भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासने व त्यांच्या यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टिने;

# “माहिती”

**“माहिती”** याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये,

अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने,ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके,आदेश,रोजवहया,संविदा,अहवाल,कागदपत्रे,नमुने,प्रतिमाने(मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधार सामग्री आणि

त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती,यांचा समावेश होतो;

# “सार्वजनिक प्राधिकरण”

**“सार्वजनिक प्राधिकरण”** याचा अर्थ,-

(क) संविधानाद्वारे किंवा तदन्वये;

(ख) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;

(ग) राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;

(घ) समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था,असा आहे आणि त्यामध्ये,

(एक) समुचित शासनाची मालकी असलेला,त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;

(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो,अशी अशासकीय संघटना यांचा समावेश होतो;

# "माहितीचा अधिकार"

**"माहितीचा अधिकार"** याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यामध्ये,-

(एक) एखादे काम,दस्तऐवज,अभिलेख यांची पाहणी करणे;

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या,उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे;

(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे;


(चार) डिस्केट्, फलॅपी,टेप,व्हीडिओ कॅसेट या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रोनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिन्ट आऊट) मार्फत माहिती मिळविणे; यांबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो;



# “त्रयस्थ पक्ष”

“त्रयस्थ पक्ष” याचा अर्थ, माहिती मिळण्याची विनंती करणा-या नागरिकाव्यतिरिक्त अन्य एखादी व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये,सार्वजनिक प्राधिकरणाचा समावेश होतो





# 3. माहितीचा अधिकार

अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून,  सर्व **नागरिकांना** माहितीचा अधिकार असेल.



# 4 माहिती अधिकार आणि सार्वजनिक प्राधिकरणावरील आबंधने

- प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण,-

(क) या अधिनियमान्वये देण्यात आलेला माहिती अधिकार मिळणे सोईचे होईल अशा रीतीने आणि स्वरूपात सर्व अभिलेख योग्य रीतीने सूचिबध्द करील आणि त्याची निर्देशसूची तयार करील आणि

ज्याचे संगणकीकरण करणे योग्य आहे, अशा सर्व अभिलेखांचे वाजवी कालावधीत आणि साधनसंपत्तीच्या उपलब्धतेनुसार संगणकीकरण केले जात आहे याची आणि

असे अभिलेख पाहावयास मिळणे सोयीचे व्हावे म्हणून संपूर्ण देशातील विविध प्रणालींमध्ये **नेटवर्कमार्फत** ते जोडले जात आहेत, याची खातरजमा करील.

## (ख) हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून एकशेवीस दिवसांच्या आत,-

## 1 ते 17 नमूने प्रसिध्द करणे



# 4. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण

- **प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण,-**

**(क)** या अधिनियमान्वये देण्यात आलेला माहिती अधिकार मिळणे सोईचे होईल अशा रीतीने आणि स्वरूपात सर्व **अभिलेख** योग्य रीतीने **सूचिबध्द** करील आणि त्याची **निर्देशसूची** तयार करील आणि ज्याचे **संगणकीकरण** करणे योग्य आहे, अशा सर्व अभिलेखांचे वाजवी कालावधीत आणि साधनसंपत्तीच्या उपलब्धतेनुसार संगणकीकरण केले जात आहे याची आणि असे अभिलेख **पाहावयास मिळणे सोयीचे व्हावे** म्हणून संपूर्ण देशातील विविध प्रणालींमध्ये **नेटवर्कमार्फत** ते जोडले जात आहेत, याची खातरजमा करील.

# (ख) हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून एकशेवीस दिवसांच्या आत,-

(एक) आपली रचना,कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील;

(दोन) आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये;

(तीन) निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती,तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली;

(चार) स्वत:ची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडून ठरविण्यात आलेली मानके;

(पाच) त्याच्याकडे असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारीवर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख;

(सहा) त्याच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण;

(सात) आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात,लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील;

(आठ) आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजन म्हणून घटित केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळाचे,परिषदांचे,समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण,आणि त्या मंडळाच्या,परिषदांच्या,समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण;

(नउ) आपल्या अधिका-यांची आणि कर्मचा-यांची  निर्देशिका;

(दहा) आपल्या प्रत्येक अधिका-याला व कर्मचा-याला मिळणारे मासिक वेतन: तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरदूत केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्याची पध्दती;

(अकरा) सर्व योजनांचा तपशील,प्रस्तावित खर्च दर्शविणारा,आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितारित केलेल्या रकमांचा अहवाल;

(बारा) अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिका-यांचा तपशील;

(तेरा) ज्या व्यक्तींना सवलती,परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली  आहेत अशा व्यक्तींचा तपशील;

(चौदा) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील;

(पंधरा) माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणा-या सुविधांचा तपशील,तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात तपशील;

(सोळा) जन माहिती अधिका-यांची नावे,पदनामे आणि इतर तपशील;

(सतरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती प्रसिध्द करील आणि त्यांनतर दरवर्षी ती प्रकाशने अद्ययावत करील;

(ग) ज्यामुळे लोकांना बाधा पोहोचते अशी महत्त्वाची धोरणे आखताना आणि असे निर्णय जाहीर करताना सर्व संबंधित वस्तुस्थिती प्रसिध्द करील;

(घ) आपल्या प्रशासनिक किंवा न्यायिकवत् निर्णयांबाबतची कारणे बाधित व्यक्तींना कळवील.

(2) माहिती मिळविण्यासाठी लोकांना या अधिनियमाचा कमीतकमी आधार घ्यावा लागावा यासाठी,नियमित कालांतराने,लोकांना इंटरनेटसह,संपर्काच्या विविध साधनांद्वारे, स्वत:हून माहिती पुरविण्यासाठी, पोटकलम(1) च्या खंड (ख) च्या आवश्यकतांनुसार उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण सतत प्रयत्नशील राहील.

(3) पोटकलम(1) च्या प्रयोजनांसाठी,प्रत्येक माहिती,विस्तृत प्रमाणात आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होईल अशा स्वरूपात आणि अशा रीतीने प्रसारित करण्यात येईल.

(4) पुरेपूर मोबदला देणारा खर्च,स्थानिक भाषा आणि त्या स्थानिक भागातील संपर्काची सर्वात प्रभावी पध्दती या बाबी विचारात घेउन, सर्व माहिती प्रसारित करण्यात येईल आणि यथास्थिति,केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्याकडे,शक्यतो इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ती माहिती मोफत किंवा विहित करण्यात येईल इतक्या माध्यमाच्या खर्चाएवढया किंवा मुद्रणाच्या खर्चाएवढया किंमतीला सहजपणे उपलब्ध असावी.


**स्पष्टीकरण**-पोटकलम(3) आणि (4) च्या प्रयोजनार्थ, "प्रसारित याचा अर्थ" सूचनाफलक, वृत्तपत्रे,जाहीर घोषणा,प्रसारमाध्यमांकडून ध्वनिक्षेपण,इंटरनेट यांच्याद्वारे किंवा कोणत्याही अन्य मार्गाने लोकांना माहिती करून देणे किंवा कळविणे,तसेच कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयाची पाहणी करू देणे, असा आहे.



# 5. जन माहिती अधिका-यांना पदनिर्देशित करणे

**5**. (1) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण,हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून शंभर दिवसांच्या आत,

या अधिनियामान्वये माहिती मिळण्याची विनंती करणा-या व्यक्तींना माहिती देण्यासाठी,त्याच्या अखत्यारीतील सर्व प्रशासकीय युनिटांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये आवश्यक असतील तेवढया जास्तीत जास्त अधिका-यांना, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी म्हणून **पदनिर्देशित** करील.



(2) पोटकलम(1) च्या तरदूतींना बाध न येउ देता, प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून **शंभर दिवसांच्या आत,**

या अधिनियमान्वये माहिती मिळण्यासाठी केलेले **अर्ज किंवा अपिले** स्वीकारून, ती तात्काळ केंद्रीय जन माहिती अधिका-यास किंवा राज्य जन माहिती अधिका-यास,किंवा कलम 19 च्या पोटकलम(1)अन्वये **विनिर्दिष्ट केलेल्या वरिष्ठ** अधिका-यास अथवा केंद्रीय माहिती आयोगास, किंवा यथास्थिति,राज्य माहिती आयोगास **पाठविण्यासाठी**,

प्रत्येक **उप विभागीय स्तरावर** किंवा **अन्य उप-जिल्हा स्तरावर**, एखाद्या अधिका-यास केंद्रीय सहायक जन माहिती अधिकारी,किंवा यथास्थिति,राज्य **सहायक जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित** करील:

- परंतु, माहिती मिळण्याबाबतचा अर्ज किंवा अपील, सहायक जन माहिती अधिका-यास देण्यात आला असेल त्याबाबतीत,कलम 7 च्या पोट-कलम (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उत्तर देण्याच्या कालावधीची संगणना करताना, त्यात आणखी **पाच दिवसांचा कालावधी मिळविण्यात येईल.**

(3) प्रत्येक जन माहिती अधिकारी,माहिती मिळण्याची विनंती करण्या-या व्यक्तींनी केलेल्या **विनंतीवर कार्यवाही करील** आणि अशी माहिती मागणा-या व्यक्तींना वाजवी **सहाय्य** करील.

(4) प्रत्येक जन माहिती अधिका-यास, त्याची किंवा तिची कर्तव्ये योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी त्याला किंवा तिला आवश्यक वाटेल अशा अन्य कोणत्याही अधिका-याचे **सहाय्य मागता** येईल.

# कलम (5) (5)

(5) पोटकलम (4) अन्वये ज्याचे सहाय्य मागण्यात आले आहे **असा कोणताही अधिकारी,**त्याचे किंवा तिचे सहाय्य मागणा-या जन माहिती अधिका-यास, **संपूर्ण सहाय्य करील** आणि

या अधिनियमाच्या तरतुदींच्या कोणत्याही **उल्लंघनाच्या प्रयोजनार्थ**, असा अन्य अधिकारी,हा, **यथास्थिति जन माहिती अधिकारी असल्याचे** समजण्यात येईल.

# 6. माहिती मिळविण्याकरिता विनंती करणे

6. (1) या अधिनियमान्वये कोणतीही माहिती मिळविण्याची इच्छा असलेली व्यक्ती, त्याने किंवा तिने मागणी केलेल्या **माहितीचा तपशील विनिर्दिष्ट** करणारी,

**इंग्रजी**मधील किंवा **हिंदी**मधील अथवा अर्ज ज्या क्षेत्रात करण्यात येत असेल त्या क्षेत्राच्या **राजभाषेमधील लेखी** स्वरूपात केलेली किंवा **इलेक्ट्रॉनिक** साधनाद्वारे केलेली विनंती,विहित करण्यात येईल अशा **फीसह,-**

(क) संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या केंद्रीय जन माहिती अधिका-याकडे, जन माहिती अधिका-याकडे;

(ख) सहायक जन माहिती अधिका-याकडे; **सादर करील**:

- परंतु, जेव्हा अशी विनंती लेखी स्वरूपात करता येउ शकत नसेल अशा बाबतीत, यथास्थिति, जन माहिती अधिकारी, **मौखिक** विनंती करणा-या व्यक्तीस, ती **लेखी स्वरूपात** आणण्यासाठी सर्व **वाजवी सहाय्य** करील.

(2) माहिती मिळण्याची विनंती करणा-या अर्जदारास, माहितीसाठी विनंती करण्यास **कोणतीही कारणे** देण्यास किंवा त्याच्याशी संपर्क साधण्यासाठी आवश्यक असेल त्याखेरील **अन्य कोणताही वैयक्तिक तपशील देण्यास**,भाग पाडण्यात **येणार नाही.**

(3) (एक) जी माहिती **अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे** असेल; किंवा

(दोन) ज्या माहितीचा विषय अन्य **सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजाशी** अधिक संबंधित असेल, अशी माहिती मिळवण्यासाठी एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्ज करण्यात आला असेल त्याबाबतीत,

ज्याच्याकडे असा अर्ज करण्यात आला आहे ते सार्वजनिक प्राधिकरण,असा अर्ज किंवा त्यास योग्य वाटेल असा त्याचा भाग, अशा अन्य **सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित** करील आणि अशा हस्तांतरणाबाबत **अर्जदारास तात्काळ माहिती देईल**.

- परंतु, या पोटकलमानुसार करावयाचे अर्जाचे हस्तांतरण, व्यवहार्य असेल तितक्या **लवकर करण्यात येईल**. मात्र, कोणत्याही परिस्थितीत ते अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून **पाच दिवसांपेक्षा अधिक विलंबाने** करण्यात येणार नाही.

# विनंतीचा अर्ज निकालात काढणे

7- (एक) कलम 5 पोटकलम(2) च्या परंतुकास किंवा कलम 6, पोटकलम(3) च्या परंतुकास अधीन राहून यथास्थिति, जन माहिती अधिकारी,कलम 6 अन्वये माहिती मिळण्याची विनंती करणारा अर्ज मिळल्यावर, **शक्य तितक्या शीघ्रतेने** आणि कोणत्याही परिस्थितीत **विनंती केल्यापासून तीस दिवसांच्या आत,** एकतर विहित करण्यात येईल अशा **फीचे प्रदान केल्यावर माहिती देईल**,

किंवा कलम 8 व 9 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणांपैकी कोणत्याही **कारणासाठी विनंतीचा अर्ज फेटाळील**:

- परंतु, जर मागितलेली माहिती, एखाद्या व्यक्तीचे **जीवित वा स्वातंत्र्य** यासंबंधातील असेल तर,विनंतीचा **अर्ज मिळाल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या** आत ती देण्यात येईल.

(दोन) जर जन माहिती अधिका-याने, पोटकलम(1) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत माहिती मिळण्याच्या विनंतीवर **निर्णय देण्यास कसूर केली** तर, अशा जन माहिती अधिका-याने विनंती **नाकारल्याचे मानण्यात** येईल.

(तीन) माहिती देण्याचा खर्च दर्शविणारी कोणतीही **जादा फी** प्रदान केल्यावर माहिती **देण्याचा निर्णय घेण्यात आला** असेल त्याबाबतीत, केंद्रीय जन माहिती अधिकारी, विनंती करणा-या व्यक्तीस,-

**(क)** पोटकलम (1) अन्वये विहित केलेल्या फीनुसार ही **जादा रक्कम** त्याने **कशाच्या आधारे ठरवली** त्या हिशेबासह, माहिती पुरविण्याचा त्याने निर्धारित केलेला खर्च दर्शविणारा जादा फीचा तपशील नमूद करणारी **सूचना** पाठवील, व त्याद्वारे तिला ती फी भरण्याची विनंती करील, आणि उक्त सूचना पाठविल्याच्या व फीचे प्रदान केल्याच्या दरम्यानचा कालावधी हा, त्या पोटकलमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तीस दिवसांच्या कालावधीची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ, वगळण्यात येईल;

**(ख)** आकारलेल्या फीच्या रकमेसंबंधीच्या किंवा दिलेल्या माहितीच्या स्वरूपा संबधीच्या **निर्णयाचे पुनर्विलोकन** करण्याच्या बाबतीतील त्याचे किंवा तिचे **अधिकार**,तसेच अपील प्राधिकारी,कालमार्यादा, प्रक्रिया व इतर कोणतेही स्वरूप याचा **तपशील**,यासंबंधीची माहिती देणारी **सूचना** पाठवील.

(4) या अधिनियामान्वये जेव्हा अभिलेखाची किंवा त्याच्या भागाची माहिती मिळवून द्यावयाची असेल आणि जिला ती माहिती मिळवून द्यावयाची आहे, अशी व्यक्ती **ज्ञानेंद्रियांच्या दृष्टिने विकलांग** असेल त्याबाबतीत, यथास्थिति, जन माहिती अधिकारी, माहिती मिळविणे ज्यायोगे शक्य होईल असे सहाय्य देईल, तसेच **पाहणी करण्यासाठी** उचित असेही सहाय्य देईल.

(5) मागितलेली माहिती जेव्हा **छापील** स्वरूपात किंवा कोणत्याही **इलेक्ट्रॉनिक** स्वरूपात द्यावयाची असेल त्याबाबतीत,पोटकलम (6) च्या तरतुदींना अधीन राहून, अर्जदार, **विहित करण्यात येईल अशी फी** प्रदान करील:

## महाराष्ट्र महितीचा अधिकार नियम, 2005

अर्जाची फी – रु 10/- **(रोख, धनाकर्ष DD, बॅंकर्स चेक, न्यायालयीन फी मुद्रांक)**

माहितीची फी –विशिष्ट दस्तऐवज इ.किंमत अगोदरच निश्चित केली अशि किंमत

- ए- 4 किंवा ए-3 आकारातील कागद **रु 2/-** + टपाल खर्च
- मोठया आकारातील कागदाच्या प्रती – **प्रत्यक्ष किंमत** + टपाल खर्च



अभिलेख पाहणीसाठी – **पहिला तास मोफत** त्यानंतर प्रत्येक **15 मिनिटास रु 5/-**

इलेट्रॉनिक्स स्वरुपातील – CD, FLOPY – **रु. 50/-**

**(रोख, धनाकर्ष (DD), बॅंकर्स चेक, मनी ऑर्डर)**

सामान्य प्रशासन विभाग, दिनांक 28/05/2007 परिपत्रक – 007,इतर प्रशासनिक सेवा,60 इतर सेवा,800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070-016-1)

परंतु, कलम 6 च्या पोटकलम (1) **(अर्जाची फी)** अन्वये आणि कलम 7 ची पोटकलमे (1)(**माहितीची फी**) व (5) (**इलेट्रॉनिक्स**) यांअन्वये विहित केलेली फी वाजवी असेल आणि अशी कोणतीही फी, ज्या व्यक्ती दारिद्रयरेषेखाली आहेत असे समुचित शासनाकडून निर्धारित करण्यात येईल अशा व्यक्तींकडून,आकारण्यात येणार नाही.

(6) पोट कलम (5) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर सार्वजनिक प्राधिकरणाने पोटकलम (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या **कालमार्यादेचे पालन करण्यात कसूर** केली असेल तर,माहिती मिळण्याची विनंती करणा-या व्यक्तीस, ती माहिती **मोफत देण्यात** येईल.

(7) पोट-कलम(1) अन्वये कोणताही निर्णय घेण्यापूर्वी घेण्यापूर्वी, यथास्थिति, राज्य जन माहिती अधिकारी, **त्रयस्थ पक्षाने कलम 11 अन्वये केलेले निवेदन विचारात** घेईल.

(8) जेव्हा पोट-कलम(1)अन्वये विनंतीचा अर्ज फेटाळण्यात आला असेल त्याबाबतीत, जन माहिती अधिकारी, माहिती मिळण्याची विनंती करण्या-या व्यक्तीस,-


(एक) असा विनंतीचा अर्ज फेटाळण्याची **कारणे**;

(दोन) ज्या कालावधीत असा विनंतीचा अर्ज फेटाळल्याच्या विरोधात **अपील** करता येईल तो **कालावधी**; आणि

(तीन) अपील प्राधिकरणाचा **तपशील**; कळवील.

(9) सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागत नसल्यास, किंवा प्रस्तुत अभिलेख सुरक्षित ठेवण्याच्या किंवा जतन करण्याच्या दृष्टीने ते हानीकारक नसल्यास, माहिती ज्या स्वरूपात मागण्यात आली असेल त्याच स्वरूपात ती सर्वसाधारणपणे,पुरविण्यात येईल.

कलम-७(९)



# माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद



**8** (1) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरवण्याचे आबंधन असणार नाही,-

(क) जी माहिती प्रकट केल्याने भारताच्या **सार्वभोमत्वाला** किंवा **एकात्मतेला**, राज्याच्या **सुरक्षेला**, **युध्दतंत्रविषयक**, वैज्ञानिक किंवा आर्थिक हितसंबंधांना, परकीय राज्यांबरोबरच्या संबंधांना बाधा पोहोचेल किंवा **अपराधाला चिथावणी** मिळेल,



हेती;

(ख) …णत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने जी प्रकाशित करण्यास **स्पष्टपणे मनाई** केली आहे किंवा जी प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा **अवनाम** होउ शकेल,अशी माहिती;



जी प्रकट केल्याने संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या **विशेषधिकाराचा भंग** …शी माहिती;



(घ) वाणिज्य क्षेत्रातील **विश्वासार्हता**, **व्यावसायिक गुपिते** किंवा **बौध्दिक संपदा** यांचा समावेश असलेली जी माहिती प्रकट करणे **व्यापक लोकहिताच्या दृष्टिने आवश्यक** आहे, अशी समक्ष प्राधिका-याची खात्री पटली असेल त्या माहिती व्यतिरिक्त, जी प्रकट केल्याने **त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी** पोहोचेल,अशी माहिती;



(ड.) जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टिने आवश्यक आहे अशी सक्षम प्राधिका-याची खात्री पटली असेल त्या माहिती व्यतिरिक्त,एखाद्या व्यक्तीच्या **विश्वासाश्रित संबंधामुळे** तिला उपलब्ध असणारी माहिती;






(च) विदेशी शासनाकडून **विश्वासपूर्वक** मिळालेली माहिती;

(छ) जी प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या **जीवितास किंवा शारीरिक** सुरक्षिततेस **धोका** निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनासाठी **विश्वासपूर्वक** दिलेल्या माहितीचा **स्त्रोत** किंवा **केलेले सहाय्य** ओळखता येईल,अशी माहिती;

(ज) ज्या माहितीमुळे अपराध्यांचा **तपास करणे** किंवा त्यांना **अटक करणे** किंवा त्यांच्यावर **खटला** दाखल करणे या प्रक्रियांमध्ये **अडथळा** येईल,अशी माहिती;



(झ) **मंत्रिमंडळाची** कागदपत्रे, तसेच, मंत्रिपरिषद, सचिव व  इतर अधिकारी यांच्या **विचारविमर्शांचे** अभिलेख:

परंतु, मंत्रिपरिषदेचे **निर्णय**,त्याची **कारणे** आणि ज्या आधारावर ते निर्णय घेण्यात आले होते ती **सामग्री** ही, निर्णय घेतल्यानंतर आणि ते प्रकरण **पूर्ण** झाल्यावर किंवा **समाप्त** झाल्यावर **जाहीर करण्यात** येईल:

परंतु आणखी असे की, या कलमामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या **अपवादांतर्गत बाबी** प्रकट करण्यात येणार नाहीत;

(त्र) जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टिने आवश्यक आहे अशी, जन माहिती अधिका-याची किंवा अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल, ती खेरीजकरून,

जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप करील, अशी **वैयक्तिक** तपशीलासंबंधातील माहिती:


परंतु, जी माहिती संसदेला किंवा राज्य विधानमंडळाला देण्यास **नकार देता येणार नाही,** ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासही नकार देता **येणार नाही.**




(2) शासकीय गुपिते अधिनियम,1923(1923 चा 19) किंवा पोट-कलम (1) अनुसार अनुज्ञेय असलेले कोणतेही अपवाद यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, **माहिती प्रकट केल्याने साध्य होणारे लोकहित हे संरक्षित हितसंबंधास होणा-या हानीपेक्षा अधिक** असेल तर, सार्वजनिक प्राधिकरण, ती माहिती **पाहण्यास** परवानगी देउ शकेल.



(3) पोट-कलम (1) च्या खंड(क), (ग) आणि (झ) च्या तरतुदींना अ ये **ज्या दिनांकास विनंती केली असेल,त्या दिनांकापासून वीस** ल, उnÂभवली असेल किंवा घडली असेल अशी कोणतीही घटना,प्रसंग किंवा बाब यासंबंधातील कोणतीही माहिती ही,कोणत्याही व्यक्तीस, त्या कलमान्वये विनंती करण्यात आल्यावर पुरविण्यात येईल:




परंतु,वीस वर्षाच्या **उक्त कालावधीची संगणना** ज्यापासून करावयाची त्या दिनांकासंबंधात कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, या अधिनियमात तरतूद केलेल्या सर्वसाधारण अपिलांना अधीन राहून, **केंद्र सरकारचा निर्णय अंतिम असेल**.



9. एखादी माहिती पुरविण्याच्या विनंतीमुळे जर, राज्याव्यतिरिक्त अन्य **एखाद्या व्यक्तीच्या कॉपीराईटचे उल्लंघन होत असेल** तर,कलम 8 च्या तरतुदींना बाधा न येउ देता, जन माहिती अधिका-यास,अशी माहिती पुरवण्याची **विनंती नाकारता येईल**.



# पृथ्थकरणीयता



10. (1) जी माहिती मिळण्यासाठी विनंती करण्यात आली आहे ती माहिती, जी प्रकट करण्याबाबत अपवाद केला होता व संबंधित असल्याच्या कारणास्तव नाकारण्यात आली असेल तेव्हा,

या अधिनियमान्वये प्रकट करण्याबाबत **अपवाद** केलेल्या कोणत्याही माहितीचा ज्यात **अंतर्भाव** नसेल आणि अपवाद केलेल्या माहितीचा समावेश असलेल्या कोणत्याही **भागापासून तो व्यवस्थितपणे पृथक करता येत असेल**, असा अभिलेखाचा भाग, पुरवण्यात येईल.

(2) पोट-कलम(1) अन्वये अभिलेखाच्या एखाद्या भागातील माहिती देण्यात आली असेल अशा प्रकरणात, जन माहिती अधिकारी, अर्जदारास खालील माहिती पुरवील-.

(क) मागणी करण्यात आलेल्या अभिलेखापैकी जी प्रकट करण्याबाबत अपवाद करण्यात आला आहे, अशी माहिती अंतर्भूत असणारा अभिलेख पृथक केल्यांनतरचा उर्वरित भाग पुरविण्यात येत असल्याची;

(ख) वस्तुस्थिती संबंधातील कोणत्याही महत्वपूर्ण प्रश्नावरील कोणत्याही निष्कर्षासह, ते निष्कर्ष ज्या सामग्रीवर आधारले होते त्या सामग्रीचा निर्देश करून, निर्णयाच्या कारणांची;

(ग) निर्णय देणा-या व्यक्तिने नाव आणि पदनाम यांची

(घ) त्याने किंवा तिने परिगणना केलेल्या फीचा तपशील आणि अर्जदारांनी जमा करणे आवश्यक असलेली फीची रक्कम यांची; आणि

(ड.) माहितीचा भाग प्रकट न करण्यासंबंधातील **निर्णयाचे पुनर्विलोकन** करण्याच्या बाबतीतील, त्याचे किंवा तिचे हक्क,कलम 19 च्या पोट- कलम(1) अन्वये किंवा माहिती आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वरिष्ठ अधिका-याचा तपशील, कालमर्यादा, प्रक्रिया आणि माहिती पुरविण्याचा इतर कोणताही प्रकार यांसह आकारलेल्या फीची रक्कम किंवा माहिती पुरविण्याचा प्रकार यांची; माहिती देणारी नोटीस देईल.

# त्रयस्थ पक्षाची माहिती



**11.** (1) या अधिनियमान्वये केलेल्या विनंतीवरून जेव्हा, एखाद्या जन माहिती अधिका-यास, **त्रयस्थ पक्षाशी** संबंधित असलेली किंवा त्यांच्याकडून पुरविण्यात आलेली आणि त्या **त्रयस्थ पक्षाकडून गोपनीय समजली जाणारी** कोणतीही माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग पुरवावयाचा असेल तेव्हा,

जन माहिती अधिकारी, अशी विनंती करण्यात आल्यापासून **पाच दिवसांच्या आत** त्या विनंतीबाबत आणि, ती माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग, **प्रकट करण्यास इच्छुक असल्याबाबत लेखी नोटीस** अशा त्रयस्थ पक्षास देईल

आणि त्रयस्थ पक्षाला, माहिती **प्रकट करावी किंवा कसे**, या संबंधात लेखी किंवा मौखिक **निवेदन** सादर करण्यासाठी, आमंत्रित करील आणि माहिती प्रकट करण्याचा निर्णय घेताना त्रयस्थ पक्षाचे असे **निवेदन विचारात घेण्यात** येईल :

**परंतु,** कायद्याने संरक्षण दिलेल्या व्यावसायिक किंवा वाणिज्यिक गुपितांच्या बाबतीत असेल ते खेरीज करून, जर **लोकहितार्थ** अशी माहिती प्रकट करणे हे, अशा त्रयस्थ पक्षाच्या हिताला होणारी कोणतीही संभाव्य हानी किंवा क्षती यापेक्षा अधिक महत्वाचे असेल तर, ती माहिती प्रकट करण्याची परवानगी असेल.

(2) जन माहिती अधिका-याकडून कोणत्याही माहितीच्या किंवा अभिलेखाच्या किंवा त्याच्या भागाच्या संबंधात, पोट-कलम (1) अन्वये त्रयस्थ पक्षावर नोटीस बजावण्यात आली असेल अशा बाबतीत, अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून **दहा दिवसांच्या आत**, प्रस्तावित माहिती प्रकट करण्यांविषयी निवेदन करण्याची **त्रयस्थ पक्षास संधी** देण्यात येईल.

(3) कलम 7 मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जन माहिती अधिकारी,कलम 6 अन्वये केलेला विनंतीचा अर्ज मिळाल्यानंतर **चाळीस दिवसांच्या आत**, पोट-कलम (2) अन्वये निवेदन करण्याची त्रयस्थ पक्षास संधी देण्यात आलेली असल्यास, ती माहिती किंवा **अभिलेख किंवा त्याचा भाग प्रकट करावा किंवा करू नये**, याबाबत **निर्णय** घेईल आणि त्याच्या **निर्णयाची लेखी नोटीस** त्रयस्थ प्रक्षास देईल.

(4) पोट-कलम (3) अन्वये दिलेल्या नोटिशीत, ज्याला नोटीस देण्यात आली असेल असा त्रयस्थ पक्ष, त्या **निर्णयाविरूध्द कलम 19 अन्वये अपील दाखल करण्यास हक्कदार असेल**, या विधानाचा समावेश असेल.

**कलम - 11**

# त्रयस्थ पक्षाची माहिती

त्रयस्थ पक्षास नोटिस
कलम-11(1) → 1

त्रयस्थ प्रक्षाचे निवेदन
कलम-11(2)

त्रयस्थ पक्षास नोटिस
कलम-11 (3) → 2

त्रयस्थ पक्षाने अपील न केल्यास → माहिती द्यावी

त्रयस्थ पक्षाने अपील केल्यास → अपील निर्णयाची वाट बघावी.

कलम 2(ढ), 7(7), 8(ड), (छ), 11 व 19 एकत्रित वाचावेत

# 12. केंद्रीय माहिती आयोग घटित करणे

12. या अधिनियमान्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्याला **नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी**, घटित करील.

**एक मुख्य माहिती** आयुक्त; आणि आवश्यक वाटतील त्याप्रमाणे **दहा पेक्षा** अधिक नसतील इतके केंद्रीय माहिती आयुक्त.

समितीच्या शिफारशीनुसार -

- **प्रधानमंत्री,** जी या समितीची अध्यक्षपदीय व्यक्ती असेल, **लोकसभेतील विरोधी पक्षनेता**; प्रधानमंत्र्याने नामनिर्देशित करावयाचा **एक केंद्रीय कॅबिनेट मंत्री.**

- मुख्य माहिती आयुक्त आणि माहिती आयुक्त हे, **कायदा, विज्ञान व तंत्रज्ञान, समाजसेवा, व्यवस्थापन, पत्रकारिता, जनसंपर्क माध्यम किंवा प्रशासन आणि शासन** या विषयांचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या, सार्वजनिक जीवनातील प्रख्यात व्यक्ती असतील.

- केंद्रीय माहिती आयोगाचे **मुख्यालय दिल्ली येथे असेल** आणि केंद्रीय माहिती आयोगास, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने, **भारतात अन्य ठिकाणी** कार्यालये स्थापन करता येतील.

# 13. पदावधी व सेवेच्या शर्ती

**13.** आपले पद धारण करील त्या दिनांकापासून **पाच वर्षांच्या कालावधीसाठी** ते पद धारण करील, आणि तो **पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही**

किंवा त्याच्या वयाची **पासष्ट वर्षे पूर्ण** झाल्यानंतर ते पद धारण करणार नाही.

- माहिती आयुक्त, आपले पद ग्रहण करण्यापूर्वी, **राष्ट्रपतीच्या समक्ष शपथ** किंवा प्रतिज्ञा घेईल.
- देय असलेले वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती या-
- मुख्य माहिती आयुक्ताच्या बाबतीत **मुख्य निवडणुक आयुक्ताप्रमाणे** असतील,
- माहिती आयुक्ताच्या बाबतीत **निवडणूक आयुक्ताप्रमाणे** असतील :

# 14. माहिती आयुक्तांना पदावरून दूर करणे

- **14.** कोणताही माहिती आयुक्त यांच्या बाबतीत, राष्ट्रपतीने सर्वोच्च न्यायालयाकडे निर्देश केल्यावरुन, **न्यायालयाने चौकशीअंती**, कोणत्याही माहिती आयुक्ताच्या, शाबीत झालेल्या गैरवर्तनाच्या किंवा असमर्थतेच्या कारणास्तव त्यास **पदावरुन दूर केले पाहिजे असा अभिप्राय दिल्यानंतर** राष्ट्रपतीच्या आदेशाद्वारेच केवळ, अशा कारणास्तव, त्याला त्याच्या पदावरुन दूर करण्यात येईल.
- पदावरुन निलंबित करुन शकेल आणि आवश्यक वाटल्यास, चौकशी चालू असताना, त्यास **कार्यालयात उपस्थित राहण्यास मनाई** देखील करु शकेल.

# 15. राज्य माहिती आयोग

15 **प्रत्येक राज्य शासन**, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याला नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी, राज्य माहिती आयोग घटित करील.

- राज्य माहिती आयोग पुढील व्यक्तींचा मिळून बनलेला असले :-

**एक राज्य मुख्य माहिती आयुक्त**; आणि आवश्यक असतील त्याप्रमाणे, **दहापेक्षा** अधिक नसतील इतके, राज्य माहिती आयुक्त.

समितीच्या शिफारशीनुसार करील—

**मुख्यमंत्री,** जी या समितीची अध्यक्षपदीय व्यक्ती असेल; विधानसभेतील **विरोधी पक्षनेता;** आणि मुख्यमंत्र्याने नामनिर्देशित केलेला **एक कॅबिनेट मंत्री.**

- राज्य माहिती आयुक्त हे **कायदा, विज्ञान व तंत्रज्ञान, समाजसेवा, व्यवस्थापन, पत्रकारिता, जनसंपर्क माध्यम किंवा प्रशासन आणि शासन** या विषयांचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या, सार्वजनिक जीवनातील **प्रख्यात व्यक्ती** असतील.

- राज्य माहिती आयोगाचे मुख्यालय हे, **राज्य शासन** राजपत्रातील अधिसूचनेद्वारे **विनिर्दिष्ट करीत अशा ठिकाणी** असेल, आणि राज्य माहिती आयोगास, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, राज्यात अन्य ठिकाणी कार्यालये स्थापन करता येतील.

# 16. पदावधी व सेवेच्या शर्ती.

16. कोणताही राज्य मुख्य माहिती आयुक्त, ज्या दिनांकास आपले पद धारण करील त्या दिनांकापासून **पाच वर्षांच्या** कालावधीसाठी ते पद धारण करील, आणि तो पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही. किंवा त्याच्या **वयाची पासष्ट वर्षे पूर्ण** झाल्यानंतर ते पद धारण करणार नाही.

- आपले पद ग्रहण करण्यापूर्वी, **राज्यपालाच्या समक्ष** शपथ किंवा प्रतिज्ञा घेईल.
- देय असलेले वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती या,--

राज्य मुख्य माहिती आयुक्ताच्या बाबतीत **निवडणूक आयुक्ताप्रमाणे** असतील,

राज्य माहिती आयुक्ताच्या बाबतीत **राज्य शासनाच्या मुख्य सचिवाप्रमाणे** असतील;

# 17. राज्य माहिती आयुक्तास पदावरून दूर करणे.

17 राज्यपालाने **सर्वोच्च न्यायालयाकडे निर्देश केल्यावरुन**, त्या न्यायालयाने चौकशीअंती, राज्य माहिती आयुक्ताच्या शाबीत झालेल्या गैरवर्तनाच्या किंवा असमर्थतेच्या कारणास्तव, त्यास **पदावरुन दूर केले पाहिजे** असा **अभिप्राय** दिल्यानंतर राज्यपालाच्या आदेशाद्वारेच केवळ अशा कारणास्तव त्याला त्याच्या पदावरुन दूर करण्यात येईल.

- अशा निदेशावर सर्वोच्च न्यायालयाकडून अभिप्राय प्राप्त होउन आपल्याकडून आदेश दिला जाईपर्यंत, **पदावरुन निलंबित** करु शकेल आणि आवश्यक वाटल्यास चौकशी चालू असतांना त्याला **कार्यालयात उपस्थित राहण्यास मनाई** देखील करु शकेल.

# माहिती आयोगांचे अधिकार व कार्ये

## 18. तक्रार

**18.(1)** या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, पुढील व्यक्तींकडून **तक्रार स्वीकारणे व त्याची चौकशी करणे** हे, माहिती आयोग यांचे कर्तव्य असेल-

(क) एकतर, या अधिनियमानुसार कोणताही **असा अधिकारी नियुक्त करण्यात आला नाही** या कारणास्तव

माहिती अधिकारी किंवा सहाय्यक जन माहिती अधिकारी याने, ज्या व्यक्तीचा या अधिनियमान्वये **माहितीसाठीचा किंवा अपिलासाठीचा अर्ज**, जन माहिती अधिकाऱ्याकडे, कलम 19 च्या पोटकलम (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्य **वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे,माहिती आयोगाकडे अग्रेषित** करण्यासाठी स्वीकारण्यास **नकार** दिला असल्याच्या कारणास्तव,

जन माहिती अधिकाऱ्याकडे विनंतीचा अर्ज सादर करण्यास जी **असमर्थ ठरली असेल** अशी व्यक्ती;

(ख) या अधिनियमान्वये मागणी करण्यात आलेली कोणतीही **माहिती मिळण्यास नकार** मिळालेली व्यक्ती ;

(ग) या अधिनियमान्वये माहितीसाठी किंवा माहिती मिळवण्यासाठी केलेल्या मागणीस **विनिर्दिष्ट मुदतीत प्रतिसाद न** मिळालेली व्यक्ती ;

(घ) **अवाजवी वाटत असलेली फी भरण्यास** जिला भाग पाडण्यात आले असेल अशी व्यक्ती ;

(ङ) या अधिनियमान्वये, आपल्याला **अपुरी, दिशाभूल करणारी किंवा खोटी माहिती** देण्यात आली असे जिला वाटत असेल अशी व्यक्ती ; आणि

(च) या अधिनियमान्वये **अभिलेख मिळविता येण्याच्या** किंवा त्यासाठी विनंती करण्याच्या संबंधातील **इतर कोणत्याही बाबींविषयी** तक्रार करणारी व्यक्ती.

(2) एखाद्या प्रकरणामध्ये चौकशी करण्यासाठी वाजवी कारणे आहेत याबाबत जर, यथास्थिति, माहिती **आयोगाची खात्री** झाली असेल तर आयोग त्याबाबतची **चौकशी सुरु करील.**

**(3)** या कममान्वये कोणत्याही बाबीची चौकशी करताना, माहिती आयोगाला पुढील बाबतीत, **दिवाणी प्रक्रिया संहिता, 1908(1908 चा 5)** या अन्वये दाव्याची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित करण्यात आलेले आहेत, तेच अधिकारी असतील:-
-

(क) व्यक्तींना हजर राहण्याबाबत **समन्स पाठवून** त्यांना हजर करविणे आणि त्यांना **शपथेवर तोंडी** किंवा **लेखी साक्षीपुरावा** देण्यास व **दस्तऐवज** किंवा **वस्तू सादर** करण्यास भाग पाडणे ;

(ख) दस्तऐवजांचा **शोध घेण्यास आणि पाहणी** करण्यास **फर्मावणे** ;

(ग) **शपथपत्रावर साक्षीपुरावा** घेणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून **कोणताही शासकीय अभिलेख** किंवा **त्याच्या प्रती** यांची **मागणी करणे**;

(ड) **साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी** करण्याकरिता समन्स काढणे ; आणि

(च) **विहित** करता येईल अशी **अन्य कोणतीही** बाब;

4) संसदेच्या, किंवा यथास्थिति, राज्य विधानमंडळाच्य अन्य कोणत्याही अधिनियमात विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, माहिती आयोग, या अधिनियमान्वये कोणत्याही तक्रारीची चौकशी करतांना,

सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील ज्या अभिलेखास **हा अधिनियम लागू** होतो, अशा **कोणत्याही अभिलेखाची तपासणी** करील,

आणि सार्वजनिक प्राधिकरण कोणत्याही कारणास्तव, आयोगापासून असा कोणताही **अभिलेख रोखून ठेवणार नाही**.

# 19. अपील

19. **(1)** ज्या कोणत्याही व्यक्तीला, कलम 7 चे पोटकलम (1) **(30 दिवस किंवा48 तास)**किंवा पोटकलम (3) चा खंड (क)**(30 दिवसांची परिगणना)** यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत **निर्णय प्राप्त झाला नसेल**, किंवा

जन माहिती अधिकारी यांच्या **निर्णयाने जी व्यथित** झालेली असेल, अशा कोणत्याही व्यक्तीला,

अशी **मुदत संपल्यापासून** किंवा असा **निर्णय प्राप्त** झाल्यापासून **तीस दिवसांच्या आत** प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांमधील जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा **वरिष्ठ दर्जाच्या** अशा अधिकाऱ्याकडे **अपील** करता येईल :

परंतु, अपीलकर्त्याला **वेळेत अपील** दाखल न करण्यास **पुरेसे कारण** होते, अशी त्या अधिकाऱ्याची खात्री पटल्यास, त्याला किंवा तिला तीस दिवसांचा **कालावधी समाप्त झाल्यानंतर** अपील दाखल करुन घेता येईल.

**(2)** कलम 11 अन्वये, त्रयस्थ पक्षाची माहिती प्रकट करण्याबाबत, जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाविरुध्द अपील दाखल करण्यात आलेले असेल अशा प्रकरणात, संबंधित **त्रयस्थ पक्षाद्वारे करावयाचे अपील हे आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवयांच्या आत करण्यात येईल.**

**(3)** पोटकलम (1) खालील निर्णयाविरुध्दचे **दुसरे अपील**, ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून **नव्वद** दिवसांच्या आत, **माहिती आयोगाकडे** दाखल करता येईल.

परंतु, अपीलकर्त्याला वेळेत अपील दाखल न करण्यास **वाजवी कारण** होते अशी, माहिती आयोगाची खात्री पटली तर, नव्वद दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याला अपील दाखल करुन घेता येईल.

**(4)** ज्याच्या संबंधीत अपील दाखल करण्यात आले असेल, असा जन माहिती अधिकाऱ्याचा निर्णय हा, त्रयस्थ पक्षाच्या माहितीच्या संबंधात असेल, तर माहिती आयोग त्या **त्रयस्थ पक्षाला**, आपले **म्हणणे मांडण्याची वाजवी संधी** देईल.

**(5)** कोणत्याही अपील कार्यवाहीमध्ये **विनंती नाकारणे हे समर्थनीय** होते हे सिध्द करण्याचा भार, ज्याने विनंती नाकारली होती त्या, **जन माहिती अधिकाऱ्यावर असेल**.

**(6)** पोटकलम (1) किंवा पोटकलम (2) अन्वये केलेले **(प्रथम) अपील**, ते मिळाल्याच्या दिनांकापासून यथास्थिति, **तीस दिवसांच्या** आत, किंवा ते दाखल केल्याच्या दिनांकापासून **एकूण पंचेचाळीस** दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत, **कारणे लेखी नमूद** करुन, निकालात काढण्यात येईल.

**(7)** माहिती आयोगाचा **निर्णय बंधनकारक** असेल.

**(8)** माहिती आयोगास, आपल्या निर्णय प्रक्रियेत पुढील अधिकार असतील,--

**(क)** या अधिनियमाच्या तरतुदींचे **अनुपालन करणे सुनिश्चित** करण्यासाठी आवश्यक असतील अशा उपाययोजना करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाला फर्मावणे; ज्यामध्ये पुढील गोष्टींचाही समावेश असेल,--

(एक) एखाद्या **विशिष्ट स्वरुपात** माहिती मिळण्याची विनंती केली असल्यास **त्या स्वरुपात माहिती** पुरविणे;

(दोन) जन माहिती अधिकाऱ्याची **नियुक्ती करणे**;

(तीन) विवक्षित माहिती किंवा माहितीचे **प्रवर्ग प्रसिध्द** करणे;

(चार) **अभिलेख ठेवणे, त्याची व्यवस्था ठेवणे व तो नष्ट करणे**, यासंबंधातील त्याच्या पध्दतीत आवश्यक ते बदल करणे;

(पाच) त्याच्या अधिकाऱ्यांना माहितीच्या अधिकाराचे **प्रशिक्षण देण्याच्या तरतुदीत वाढ** करणे;

(सहा) कलम 4 च्या पोटकलम (1) च्या खंड (ख) चे अनुपालन करुन आयोगाला **वार्षिक अहवाल** सादर करणे;

**(ख)** कोणत्याही **नुकसानीबद्दल** किंवा झालेल्या अन्य हानीबद्दल **भरपाई देण्यासाठी** सार्वजनिक प्राधिकरणाला फर्मावणे;

**(ग)** या अधिनियमामध्ये तरतूद केलेली कोणतीही **शास्ती लादणे**;

**(घ)** **अर्ज फेटाळणे**.

**(9)** माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला **आपल्या निर्णयाबाबत** तसेच **अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत** कळवील.

**(10)** माहिती आयोग, विहित करण्यात येईल अशा कार्यपध्दतीनुसार **अपिलावर निर्णय** देईल.

# 20. शास्ती

**20. (1)** माहिती आयोगाने कोणत्याही **तक्रारीवर** किंवा **अपिलावर** निर्णय देतेवेळी,

- जन माहिती अधिकाऱ्याने, कोणत्याही **वाजवी कारणाशिवाय** माहिती मिळण्याबाबतचा **अर्ज स्वीकारण्यास नकार** दिला आहे, किंवा
- कलम 7 च्या पोटकलम (1) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या **वेळेत माहिती सादर** केलेली नाही, किंवा
- माहिती मिळवण्यासाठी केलेली विनंती **दुष्ट हेतूने** नाकारली आहे, किंवा
- जाणूनबुजून**चुकीची, अपुर्ण किंवा दिशाभूल** करणारी माहिती दिलेली आहे, किंवा
- मागितलेली माहिती **नष्ट केलेली** आहे, किंवा
- माहिती सादर करण्यात कोणत्याही प्रकारे **अडथळा आणला** आहे,

असे आयोगाचे मत झाले असेल तर, तो, अर्ज स्वीकारीपर्यंत किंवा माहिती देईपर्यंत प्रत्येक **दिवसाला रुपये दोनशे पन्नास** इतकी शास्ती लादेल. तथापि, अशा शास्तीची एकूण **रक्कम पंचवीस हजार रुपयांपेक्षा** अधिक असणार नाही :

- परंतू, जन माहिती अधिकाऱ्यास, त्याच्यावर कोणताही शास्ती लादण्यापूर्वी आपले **म्हणणे मांडण्याची वाजवी संधी** देण्यात येईल:
- परंतू आणखी असे की, त्याने केलेली कृती ही वाजवी होती हे **शाबीत करण्याची जबाबदारी**, जन माहिती अधिकाऱ्यावर असेल.

**(2)** माहिती आयोगाचे, कोणत्याही **तक्रारीवर किंवा अपिलावर निर्णय** देतेवेळी जर असे मत झाले असेल की,

- ✓ जन माहिती अधिकाऱ्याने, कोणत्याही वाजवी कारणांशिवाय आणि सातत्याने, माहिती मिळण्याबाबतचा अर्ज **स्वीकारण्यात कसूर** केली आहे किंवा
- ✓ कलम 7 च्या पोटकलम (1) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या **वेळेत माहिती** सादर केलेली नाही, किंवा
- ✓ माहिती मिळवण्याची विनंती **दुष्ट हेतून** नाकरलेली आहे किंवा
- ✓ जाणूनबुजून**चुकीची, अपुर्ण किंवा दिशाभूल** करणारी माहिती दिलेली आहे, किंवा
- ✓ मागितलेली **माहिती नष्ट केलेली** आहे, किंवा
- ✓ माहिती सादर करण्यात कोणत्याही प्रकारे **अडथळा आणला** आहे, **तर,**

***आयोग***, जन माहिती अधिकाऱ्याविरुध्द, त्याला लागू असलेल्या **सेवानियमान्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस** करील.

# 21.सद् भावनेने केलेल्या कृतीला संरक्षण

या अधिनियमान्वये किंवा त्याखालील केलेल्या कोणत्याही नियमांन्वये सद् भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, कोणत्याही व्यक्तीविरुध्द दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

## 22. अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे.

**22.** या अधिनियमाच्या तरतुदी, **या शासकीय गुपिते अधिनियम, 1923(1923 चा 19)** यामध्ये, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा अधिनियमाखेरीज कोणत्याही अन्य कायद्याच्या आधारे अंमलात असणाऱ्या कोणत्याही संलेखामध्ये त्याच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, अंमलात येतील.

# 23. न्यायालयांच्या अधिकारितेस आडकाठी.

**23.** कोणतेही न्यायालय, अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या संबंधातील कोणताही **दावा, अर्ज किंवा इतर कार्यवाही** दाखल करुन घेणार नाही आणि या अधिनियमान्वये केलेल्या अपिलाद्वारे असेल त्याखेरीज, असा आदेश प्रश्नास्पद करता येणार नाही.

# 24. विवक्षित संघटनांना हा अधिनियम लागू नसणे.

**24. (1)** या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, दुसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या **गुप्तवार्ता व सुरक्षा संघटना** यांसारख्या, केंद्र सरकारने स्थापन केलेल्या संघटनांना किंवा अशा संघटनांनी त्या सरकारला सादर केलेल्या कोणत्याही माहितीला, लागू असणार नाही :

परंतु, **भ्रष्टाचार व मानवी हक्कांचे उल्लंघन** यांच्या आरोपांशी संबंधित माहिती या पोटकलमान्वये वगळण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, मगितलेली माहिती ही, मानवी हक्काच्या उल्लंघनाच्या आरोपासंदर्भात असल्यास, ती माहीत **केंद्रीय माहिती आयोगाची मान्यता मिळाल्यावरच पुरवण्यात येईल**, आणि कलम 7 मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशी माहिती, विनंतीचा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून **पंचेचाळीस दिवसांच्या** आत देण्यात येईल.

(2) **केंद्र सरकारला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे**, त्या सरकारने स्थापन केलेल्या अन्य कोणत्याही गुप्तवार्ता किंवा सुरक्षा संघटनांना अनुसूचीमध्ये समावेश करुन किंवा त्यामध्ये अगोदरच विनिर्दिष्ट केलेली कोणताही संघटना त्यामधून वगळून, अनुसूचीमध्ये सुधारणा करता येईल आणि अशी अधिसूचना प्रसिध्द झाल्यावर, अशी संघटना, यथास्थिती, अनुसूचीमध्ये समाविष्ट असल्याचे, किंवा अनुसूचीमधून**वगळल्याचे मानले** जाईल.

# 25. संनियंत्रण करणे व अहवाल देणे.

**25. (1)** माहिती आयोग, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, प्रत्येक वर्ष समाप्त झाल्यावर या अधिनियमाच्या तरतुदींच्या त्या वर्षातील **अंमलबजावणीबाबतचा अहवाल** तयार करीलव त्याची एक प्रत समुचित शासनाला पाठवील.

(2) प्रत्येक मंत्रालय किंवा विभाग त्यांच्या अधिकारितेतील सार्वजनिक प्राधिकरणासंबंधी **माहिती गोळा करील** आणि या कलमान्वये अहवाल तयार करण्यासाठी आवश्यक असेल अशी माहिती, माहिती आयोग यांना देईल आणि ही माहिती पुरविण्यासंबंधातील आणि या कलमाच्या **प्रयोजनांकरिता अभिलेख ठेवण्यासंबंधातील** आवश्यक बाबींचे अनुपालन करील.

# 26. समुचित शासनाने कार्यक्रम तयार करणे.

26. (1) समुचित शासनाला, वित्तीय व इतर साधनसंपत्तीच्या उपलब्धतेनुसार,--

(क) या अधिनियमान्वये अभिप्रेत असलेल्य अधिकारांचा वापर कसा करावयाचा यासाठी **समाजाचे, विशेषत: समाजातील उपेक्षित वर्गांचे प्रबोधन** करण्याकरीता शैक्षणिक कार्यक्रम तयार करता येतील व त्यांचे आयोजन करता येईल.

(ख) खंड (क) मध्य निर्देश केलेले कार्यक्रम तयार करणे व त्यांचे आयोजन करणे, यांमध्ये **सार्वजनिक प्राधिकरणांना सहभागी** होण्यास आणि त्यांनी असे कार्यक्रम स्वत: हाती घेण्यास प्रोत्साहन देता येईल;

- (2) समुचित शासन, या अधिनियमाच्या प्रारंभापासून **अठरा महिन्यांच्या** आत, या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यास इच्छुक असणाऱ्या व्यक्तीला वाजवीरीत्या **आवश्यक असेल अशी माहिती असणारी मार्गदर्शिका**, अगदी सहज आकलन होईल अशा स्वरुपात व अशा पध्दतीने आपल्या राज्यभाषेत संकलित करील.

# 27. समुचित शासनाचा नियम करण्याचा अधिकार

27. (1) समुचित शासनाला, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी राजपत्रातील अधिसुचनेद्वारे **नियम करता येतील.**

(2) विशेषत: आणि पूर्वगामी **अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न येउ देता** या नियमांमध्ये, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :-

(क) कलम 4 च्या पोट-कलम (1) अन्वये ज्याचा प्रसार करावयाचा आहे अशा **साहित्याच्या प्रसिध्दी माध्यमाच्य खर्चाएवढी किंमत**;

(ख) कलम 6 च्या पोट-कलम (1) अन्वये **देय असलेली फी** ; (अर्जाची फी)

(ग) कलम 7 ची पोट-कलमे (1) आणि (5) अन्वये **देय असलेली फी**; (माहितीचे शुल्क)

(घ) अधिकारी आणि कर्मचारी यांना कलम 13 च्या पोट-कलम (6) अन्वये देय असलेले **वेतन व भत्ते** आणि कलम 16 च्या पोट-कलम (6) खालील त्यांच्या **सेवेच्या अटी व शर्ती ;**

(ड) कलम 19 च्या पोट-कलम (10) अन्वये दाखल केलेल्या **अपिलांवर निर्णय देतेवळी**, माहिती आयोगाने अनुसरावयाची **कार्यपध्दती**; आणि

(च) विहित करणे आवश्यक असेल अशी अथवा **विहित करण्यात येईल अशी अन्य** कोणतीही बाब.

# 28. सक्षम प्राधिका-याचा नियम करण्याचा अधिकार

28. (1) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी, **सक्षम प्राधिकाऱ्यास**, राजपत्रातील अधिसुचनेद्वारे नियम करता येतील.

(2) विशेषत:, आणि पुर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणेतस बाध न येउ देता, या नियमांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल:--

(एक) कलम 4 च्या पोट-कलम(4) अन्वये ज्याचा प्रसार करावयाचा आहे अशा साहित्याच्या प्रसिध्दी माध्यमाच्या खर्चाएवढी किंवा मुद्रणाच्या खर्चाएवढी किंमत;

(दोन) कलम 6 च्या पोट-कलम (1) अन्वये देय असलेली फी;

(तीन) कलम 7 च्या पोट-कलम (1) अन्वये देय असलेली फी; आणि

(चार) विहित करणे आवश्यक असेल अशी अथवा विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

# 29. नियम सभागृहापुढेठेवणे

- 29. (1) या अधिनियमान्वये केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना, एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल, आणि पुर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येउ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर, तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही, तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शुन्यीकरणामुळे, तत्पुर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राहयतेस बाध येणार नाही.
-

- (2) या अधिनियमान्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो अधिसूचित करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल.

# 30. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

- **30.** (1) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवली तर, केंद्र सरकारला, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वा इष्ट वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी करता येतील :
- परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांका पासून दोन वर्षांच कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.
- (2) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहा पुढे ठेवण्यात येईल.

# 31. निरसन

- **31.** माहितीचे स्वातंत्र अधिनियम, 2002 (2003 चा 5) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

# अनुसूची दोन

- 1. गुप्तवार्ता केंद्र
- 2. मंत्रिमंडळ सचिवालयाची संशोधन व विश्लेषण शाखा
- 3. महसूल गुप्तवार्ता संचालनालय
- 4. केंद्रीय आर्थिक गुप्तवार्ता विभाग
- 5. अंमलबजावणी संचालनालय
- 6. अंमली औषधिद्रव्य नियंत्रण विभाग
- 7. विमानचालन संशोधन केंद्र
- 8. विशेष सरहद्द दल
- 9. सीमा सुरक्षा दल
- 10. केंद्रीय राखीव पोलीस दल
- 11. भारत-तिबेट सीमा पोलीस
- 12. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल
- 13. राष्ट्रीय सुरक्षा रक्षक
- 14. आसाम रायफल
- 15. विशेष सेवा विभाग
- 16. विशेष शाखा (गुन्हे अन्वेषण विभाग) अंदमान व निकोबार
- 17. गुन्हेशाखा-गुन्हे अन्वेषण विभाग-केंद्रीय शाखा-दादरा आणि नगर हवेली
- 18. विशेष शाखा, लक्षद्वीप पोलीस.

# धन्यवाद